**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1315 नाग/2010 व अपील क्रमांक 1316 नाग/2010.**

श्री संदीप सुधाकर मुंजे
के.ऑफ श्री दि.वि.देशपांडे, प्लॉट क्र.72,
पुष्पक, सहनिवास फ्लॅट क्र.204,
पांडे ले आऊट खामला, नागपूर 440025 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सोहबराव पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,
वाहतुक विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री अशोक धोत्रे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
वाहतुक विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.4.2010 रोजी दोन अर्जांच्या माध्यमातून सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा पश्चिम व सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), यांचेकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, वा.वि.नाग. पश्चिम यांचे जा.क्र.सापोआ/वावि/256/2009 नुसार दि.12.9.2009 रोजी पो.उपायुक्त, वा.वि.नाग.शहर यांना सादर केलेल्या तथाकथीत चौकशी अहवालाबाबत अर्जदाराने पो.उपायुक्त, वा.वि.नाग.शहर यांचे आदेशानुसार सहाय्यक पोलीस आयुक्त, वा.वि. पश्चिम नाग.शहर यांनी दि. 3.5.2009 रोजीचे घटनेची तथाकथीत चौकशी करुन पो.उपायुक्त, वा.वि.नाग.शहर यांना सादर केलेला चौकशी अहवाल या विषयाची रीतसर लेखी तक्रार दि. 2.10.2009 रोजी पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे दाखल केली. व त्या संदर्भामध्ये एकुण अनेक मुद्यांच्या माध्यमातून माहिती

मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती दोन्ही अर्जात शब्दशः एकच आहे. फक्त सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा पश्चिम व सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचेकडे वेगवेगळे दोन अर्ज (एकाच माहितीचे) सादर केले. सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा पश्चिम यांचेकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 6.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचेकडे जो अर्ज केला तो अर्ज अर्थातच माहिती वाहतुकीची असल्यामुळे त्यांचेकडे हस्तांतर केला. मात्र त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आतापर्यंत काहीही माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे त्यांनी दि. 22.5.2010 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केली. दोन्ही प्रथम अपीलांचे विषय एकच असल्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 28.6.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला आहे. परंतू त्या निर्णयाच्या संदर्भामध्ये खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये चौकशी अहवालाची प्रत जोडलेली आहे असे जे म्हटलेले आहे ते खोटे व दिशाभूल करणारे आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती विचारलेली आहे ती वर्धा रोड, होटल प्राईड समोर वाहनाच्या संदर्भामध्ये वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे असल्यामुळे त्या ठिकाणी जामर लावून कार्यवाही करण्यात आली होती. अर्थात वाहतुकीची कोंडी होवू नये म्हणून अशा प्रकारच्या उपाययोजना केल्या जातात. त्यात दंड सुध्दा वसुल केल्या जातो. व तो प्रश्न त्याच ठिकाणी संपविल्या जातो. प्रकाश गजभिये नगर सेवक घटनास्थळी उपस्थित झाले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे विरुध्द कार्यवाही का केली नाही. त्याकरीता त्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. या संपूर्ण एकाच प्रकरणाची चौकशी वेगवेगळया पध्दतीने होत नसते. ही चौकशी ज्या पध्दतीने केलेली आहे त्या सर्व प्रकरणाची कागदपत्रे व माहिती अपीलकर्ता यांना दि. 17.9.2009 रोजी देण्यात आलेली आहे. परंतू अपीलकर्ता वारंवार एकच एक माहिती वेगवेगळया अर्जांच्या माध्यमातून किंवा वरिष्ठांकडे तक्रारी करुन चौकशी करावी अशा पध्दतीने मागत असतात. वाहतुक कोंडीच्या संदर्भातील प्रकरणे ही तिथेच सोडविली जातात. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची अपीले खारीज करण्यास पात्र आहेत. अपीलकर्ता यांना अर्जाच्या अनुषंगाने सुध्दा दि. 6.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व दोन्ही अर्ज सारखेच असल्यामुळे व दुसराही अर्ज हा वाहतुक विभागाकडे वर्ग केलेला असल्यामुळे दोघांचेही उत्तर एकच आहे.

4. सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रकरण हे फार गंभीर गुन्हयाचे नाही व वाहतुक कोंडीच्या संदर्भामध्ये आहे व त्यामुळे प्रकरणात संपूर्ण

चौकशी ज्या पध्दतीने झालेली आहे त्या पेक्षा पुन्हा पुन्हा चौकशी होणे हे योग्य नाही. अपीलकर्ता यांनी अशा प्रकारे वारंवार एकच एक माहिती मागितली व त्याच संदर्भात तक्रार करावयाची व पुन्हा त्या तक्रारीची चौकशी केली नाही म्हणून माहितीच्या अधिकारात माहिती मागवावी हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित नाही किंवा पारदर्शकतेचा प्रश्नही उपस्थित होत नाही. ज्या पध्दतीनी घटना झालेली आहे त्याची सर्व माहिती अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपील क्रमांक 1315 नाग/2010 व अपील क्रमांक 1316 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांना पूर्वीच माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व वारंवार वेगवेगळया पध्दतीने अर्ज करुन तक्रारी करुन कार्यवाही करण्याकरीता वारंवार अर्ज करीत असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1016-1018

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1320 नाग/2010 व अपील क्रमांक 1321 नाग/2010**

श्री वाय. एम. माटे
विद्यानगर, तलाठी कार्यालयामागे, ब्रम्हपूरी
पो. ब्रम्हपूरी ता. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री मानकर
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 10.6.2010 व दि. 20.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (पंचायत विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या संदर्भात तसेच ग्रामसेवकाच्या पदोन्नतीच्या संदर्भात सन 1986 ते 2010 या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. दोन्ही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दि. 15.6.2010 व दि. 26.4.2010 रोजी मुद्येनिहाय माहितीच्या संदर्भामध्ये कळविण्यात आलेले दिसून येते. व तसेच 590 पृष्ठांचे एकुण 1180/- रु. व 71 प्रतीचे एकुण 142/- रु. चा भरणा करण्यास कळविले. अपीलकर्ता यांनी सदरच्या रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देता देण्यात आली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अनुक्रमे दि. 13.7.2010 व दि. 31.5.2010 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केली. दोन्ही प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. 26.7.2010 रोजी दोन्ही अपीले खारीज केलेली दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती ही त्यांचेवर अन्याय झालेला असल्यामुळे मागितलेली आहे. त्याकरीता जेवढया प्रमाणात माहिती मागितली होती त्या सर्व माहितीच्या पृष्ठांचा खर्च भरण्यास तयार आहे व तसे ते भरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संपूर्ण आस्थापनेच्या संदर्भातील आहे व सदरच्या माहितीचे कमीत कमी 1000 ते 1500 नस्त्या होतील व त्यातील कागदपत्रांचा अंदाज घेता येत नाही. व त्यामुळे पृष्ठ संख्या तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास (1986 पासून असल्यामुळे) विलंब लागेल असेही त्यांना कळविलेले आहे. अपीलकर्ता

यांना पदोन्नतीचे प्रस्तावातील कागदपत्रे हवी आहेत. परंतू त्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 8 (घ) प्रमाणे सदरच्या प्रस्तावाची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. तसेच आदर्श ग्रामसेवक पुरस्काराच्या संदर्भामध्ये सुध्दा जे निकष असतील त्या संदर्भातील कागदपत्रे पुरविता येणार नाही असे कळविलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात मागितलेली आहे. परंतू सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये संपूर्ण खर्च भरण्यास तयार आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असले तरी संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती काढण्याकरीता कार्यालयीन यंत्रणा ही प्रमाणा बाहेर वळवावी लागेल परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतरच त्यांना संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढून देण्याची सुरुवात केल्यास अडचण येवू शकणार नाही. पदोन्नतीचे प्रस्ताव हे गोपनिय नाही व त्यामुळे सदरच्या प्रस्तावाच्या छायांकित प्रती सुध्दा उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. व त्यामुळे यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे शास्तीचा विचार करता येत नाही.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1320 नाग/2010 व अपील क्रमांक 1321 नाग/2010 हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या अंदाजे पृष्ठ संख्या ही अधिनियमाच्या कलम 7 (3) प्रमाणे कळवावी व प्रती पृष्ठ 2/- रु. प्रमाणे कळविण्यात यावी. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अंदाजित रकमेचा भरणा करावा. छायांकित प्रती, पृष्ठ संख्या कमी झाल्यास अतिरिक्त खर्चाचा भरणा परत करण्यात यावा. व पृष्ठ संख्या जास्त झाल्यास अपीलकर्ता यांनी त्या प्रमाणात पुन्हा भरणा करावा. संपूर्ण प्रक्रिया अपीलकर्ता यांनी पैशाचा भरणा केल्या नंतर 3 दिवसात सुरु करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**<br>**राज्य माहिती आयुक्त,**<br>**राज्य माहिती आयोग,**<br>**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**<br>Ageyord6.1019-1020

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव<br>राज्य माहिती आयोग,<br>खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1325 नाग/2010**

श्री आय. बि. नन्नावरे
मारोती वार्ड हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा 442301 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री अनुप मेश्राम
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत राळेगाव
पो. चारगांव (बुज)
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.10.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत राळेगाव यांचेकडे राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या सुनावणीच्या संदर्भात व त्यानंतर माहिती पाठविल्याच्या संदर्भात त्यांनी एकुण 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.4.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केला होता. परंतू माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 15.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या दि. 26.11.2008 च्या अर्जाप्रमाणे राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतू ती दिशाभूल करणारी व चुकीची माहिती होती. व त्यामुळे त्यांना त्या माहितीच्या संदर्भामध्ये पुन्हा माहितीचा अर्ज दाखल करावा लागला. त्याप्रमाणे पैशाचा भरणा सुध्दा केला परंतू त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता हे वारंवार तीच माहिती मागत असतात. त्याप्रमाणे त्यांचे अपील क्रमांक 533 व 534/2009 हे खारीज करण्यात आलेले आहे. क्रमांक 565/2009 माहिती पाठविल्यानंतर रद्य करण्यात आली परंतू अपीलकर्ता पुन्हा पुन्हा तीच माहिती वेगळया पध्दतीनी मागत असतात. अपीलकर्ता जेवढया प्रमाणात माहिती मागतात तेवढया माहिती मागण्यामध्ये व्यापक जनहित काहीही नाही. व त्यामुळे अपीलकर्ता

यांचे दोन्ही अपीले ही खारीज करण्यात यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागत असतात. त्यांना संपूर्ण माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. आता नव्याने कोणतीही माहिती उपलब्ध नाही. त्यांनी केलेली तक्रार सुध्दा खारीज झालेली आहे. संवर्ग विकास अधिकारी यांनी त्यांना पूर्वी दिलेल्या माहितीची कागदपत्रे सुध्दा जोडलेली आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असतांना सुध्दा ते आयोगाकडे तक्रार करतात व आयोगाने तक्रार रद्य केल्या नंतर खोटी माहिती दिली असे पुन्हा प्रतिपादन करतात. अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीचा विचार केला असता राज्य माहिती आयोगाकडे जी अपीले झाली होती त्यांचे निर्णय झालेले आहेत. त्यांनी पुन्हा कागदपत्रे मागणे हा त्रास देण्याचा उद्येश आहे. तसेच दि. 25.5.2009 ला ग्रामपंचायत रेकॉर्ड तपासणी करणे बाबत स्वतंत्र अर्ज पाठविला. तपासणीचा वेळ व दिनांक केव्हा कळविणार अशी माहिती मागितली. अशा प्रकारची माहिती मागण्याचे त्यांनी तंत्र स्वीकारलेले दिसते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती मागण्या पेक्षा जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्रास देण्याचा त्यांचा हेतू आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांना संपूर्ण ग्रामपंचायतचा रेकॉर्ड तपासण्याचा काहीही अधिकार नाही. वास्तविक माहितीच्या अधिकारात त्यांना आवश्यक ती माहिती मिळू शकते किंवा त्यांना थोडक्यात माहिती मिळू शकते. परंतू ग्रामपंचायतचे रेकॉर्ड तपासणार हया एका कारणावरुन अपीलकर्ता यांचा हेतू दिसून येतो.व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1022-1023

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1330 नाग/2010, अपील क्रमांक 1331 नाग/2010 व अपील क्रमांक 1332 नाग/2010,**

श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे
रा. सावनेर वार्ड क्र. 17 रा.
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 1330 नाग/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा लेखापाल
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

**<u>अपील क्रमांक 1331नाग/2010 व अपील क्रमांक 1332 नाग/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री पी. आर. पांडे
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1330 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा लेखापाल नगर परिषद सावनेर यांचेकडे दि. 16.7.2010 रोजी झालेल्या विशेष सभेतील सर्व ठरावाच्या प्रती मिळणेबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र दि. 12.8.2010 रोजी झालेल्या विशेष सभेतील सर्व ठरावाच्या प्रती तयार असून एकुण 20 झेरॉक्स प्रती आपणास पुरविण्यात येत आहे. एकूण प्रतीचे रु.40/– जमा करुन घेवून जाण्याकरीता कळविण्यात आले. भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना ठरावाच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यानंतर मात्र दिनांक 16.8.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना ठरावाच्या इतिवृत्ताचे छायांकित प्रती देण्यात आलेले आहे. परंतू प्रत्यक्षात सत्यप्रती त्यांना अपेक्षित होत्या त्या दिलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या दिवशी विशेष सभा दि. 16.7.2010 रोजी होती त्याच दिवशी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे ठरावाच्या प्रतीची माहिती मागितली. विशेष सभा ज्या दिवशी होते त्याच दिवशी इतिवृत्त लिहिले जातात. सत्यप्रती हया नंतर तयार केल्या जातात व त्यास कोणत्याही प्रकारचा कालावधी हा दिलेला नाही त्यामुळे माहितीच्या अधिकारामध्ये मुदतीत इतिवृत्ताच्या प्रती हया माहिती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत व तसे त्यांना दि. 19.7.2010 रोजी कळविण्यात आले होते. त्यामुळे विहित मुदतीत त्यांना कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये कोणताही मुद्या उपस्थित झालेला दिसून येत नाही. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा दिशाभूल करणे या पेक्षा दुसरा कोणताही मुद्या त्यांनी उपस्थित केला नाही. मात्र युक्तीवाद करतांना त्यांना प्रत्येक ठरावाच्या सत्यप्रतीच्या छायांकित प्रती पाहिजे असे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की त्यांनी तशी मागणी केलेली नव्हती व त्यामुळे त्यांना इतिवृत्ताची माहिती देण्यात आली होती. परंतू ठरावाच्या सत्यप्रती सुध्दा त्यांना उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1331 नाग/2010 व अपील क्र. 1332 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 16.7.2010 व दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता बांधकाम विभाग यांचेकडे 1 जानेवारी 2007 ते 31 डिसेंबर 2009पर्यंत 7/12 चे आधारे जे जे प्लॉट, बांधकाम भुखंड गुंठेवारी अधिनियमाखाली नियमाधीन केले त्याची यादी मिळण्याबाबत तसेच मुख्याधिकारी तथा जन माहिती अधिकारी नगर परिषद सावनेर यांचेकडे दलित वस्ती विकास योजनेतील मंजूर काम संडासचे बांधकाम

त्वरित सुरु करण्या बाबत दि. 14.5.10 ला दिलेल्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची माहिती देण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 21.7.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.8. 2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.8.2010 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

5. दुस–या अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 4.7.2010 रोजी विषयांकित निवेदनावर आतापर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच इतर माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 16.8.2010 रोजी दिलेला आहे. जन माहिती अधिका–यांने नियमानुसार सुचना व कार्यवाहीची माहिती दिलेली असल्यामुळे प्रकरण नस्ती करण्यात आले त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

6. वरील दोन्ही अपीलांच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या गुंठेवारी नियमित करण्याच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे त्या संबंधामध्ये त्रिस्तरीय समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीने अहवाल मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे व जिल्हाधिकारी यांनी पोलीस चौकशी सुरु केलेली आहे. पोलीस चौकशीमध्ये सर्व अभिलेखे जप्त करण्यात आलेली आहेत. व त्यामुळे माहिती तयार करुन उपलब्ध करुन देता येत नाही. त्याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की सर्व चौकशी संपल्यानंतर व पोलीसांकडून अभिलेखे परत आल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिली तरी चालेल त्याबाबत अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

7. दुस–या अर्जाच्या संदर्भातील निवेदनावर काय कार्यवाही झाली याबाबत अपीलकर्ता यांना वारंवार काहीही कार्यवाही झालेली नाही अशा पध्दतीनी उत्तरे दिली जातात व आजही कार्यवाही झालेली नाही असेच त्यांनी उत्तर दिलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उत्तर जरी योग्य असले तरी आलेले अर्ज वरिष्ठांकडे सादर न करता ते तसेच पडून ठेवणे याबाबत दप्तर दिरंगाई कायद्याच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. ती कार्यवाही ही मुख्याधिकारी नगर परिषद यांनी करावयाची आहे. व त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 1330 नाग/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्या दि. 16.7.2010 च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या ठरावाच्या सत्यप्रती या माहितीच्या अधिकारात दिल्या असे प्रमाणित करुन द्यावे.

2) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 1331 नाग/2010 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 16.7.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती मागितली आहे त्या संदर्भामध्ये पोलीस चौकशी संपल्यानंतर अहवाल सादर झालेला असल्यास किंवा अंतीम कार्यवाही झाल्यावर अपीलकर्ता यांना सदरची यादी उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपील क्र. 1332 नाग/2010 अपीलकर्ता यांच्या दि. 10.5.2010 च्या अर्जा मध्ये दि. 14.5.2010 च्या निवेदनावर झालेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1025-1028

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1328 नाग/2010

श्री किशोर कालीदास ओकजवार
39, न्यु जागृती कॉलनी, काटोल रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. व्ही. निनावे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधीक्षक
महानगर पालिका नागपूर
2) श्री रोकडे
जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक
प्रवर्तन विभाग महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.10.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधीक्षक प्रवर्तन विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे प्रवर्तन विभागात कार्यरत असलेले श्री वामन भलावी यांच्या आर्थिक व्यवहाराच्या संदर्भात एकुण 7 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 30.9.2010 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व निर्णय दिलेला असून जन माहिती अधिकारी श्री रोकडे सी.ई.अे. यांना निर्देश देवून अपीलकर्ता यांना माहितीचा मुद्या क्र. 2,4,6 व 7 बाबतची उरलेली माहिती व कागदपत्रे त्यांना पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली परंतू ती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा माहिती

विलंबाने उपलब्ध झाली. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती ही 31.8.2010 ला तयार करण्यात आली होती पण अपीलकर्ता हे माहिती घेण्याकरीता आले नसल्यामुळे दि. 22.9.2010 ला रजिस्टर अे.डी.द्वारे त्यांचे पत्त्यावर पाठविण्यात आले. परंतू तत्पूर्वीच प्रथम अपील दाखल झाले होते असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो. माहिती विलंबाने दिली यांच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी श्री रोकडे यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांचेकडे सदरच्या पदाचा कार्यभार हा दि. 29.5.2010पर्यंत एकूण 34 दिवसाकरीता होता. व त्यांनी सदरचा कार्यभार हा दि. 8.6.2010 रोजीच हस्तांतरीत करण्यात येत आहे असे प्रवर्तन अधीक्षक यांना कळविण्यात आलेले होते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 29.5.2010 रोजी आल्यानंतर च्या कालावधीत श्री रोकडे यांचे म्हणणे असे आहे की ते जन माहिती अधिकारी नव्हते. प्रवर्तन अधीक्षक प्रवर्तन विभाग यांनी दि. 1.10.2010 रोजी श्री राहुल रोकडे यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहिले नाही व कार्यालयात कोणत्याही प्रकारचा लेखी अर्ज सादर न करता कार्यालयातून गैरहजर होते व दि. 1.10.2010 ला हजेरी पटावर स्वाक्षरी केली याबाबतचे लेखी स्पष्टिकरण मागितलेले दिसून येते. त्यावर पुन्हा दि. 4.10.2010 रोजी श्री राहुल रोकडे यांनी प्रवर्तन अधीक्षक यांना त्यांचेकडे पदभार दि. 29.5.2010पर्यंतच होता. माहिती अधिकारी म्हणून कोणताही कार्यभार नव्हता. दि. 27.7.2010 च्या अनुषंगाने दि. 30.9.2010 रोजी असलेल्या अपीलाबाबत कोणतेही पत्र दिलेले नाही त्यामुळे मी कुठल्याही प्रकारची माहिती देणे योग्य ठरत नाही. दि. 30.9.2010 रोजी सुटीवर होतो व सही नजरचुकीने करण्यात आलेली आहे व किरकोळ रजेचा अर्ज सादर करण्यात आलेला आहे असे प्रवर्तन अधीक्षक यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतू प्रवर्तन अधीक्षक यांनी आयोगापुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांचा दि. 29.5.2010 रोजी कार्यभार जरी संपलेला असला तरी त्यांना आर. एस. चकोले माहिती अधिकारी यांनी वैद्यकीय रजा वाढविल्यामुळे ते येईपर्यंतचा कार्यभार सांभाळावा असे सांगितले होते. परंतू श्री राहुल रोकडे यांनी तशाप्रकारे कोणताही अतिरिक्त भार त्यांचेकडे नव्हता असे आयोगापुढे सांगितले. अर्थात जन माहिती अधिकारी कोण असावेत ही बाब सार्वजनिक प्राधिकरणाची प्रशासकीय बाब आहे. व त्याबाबत सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखानी जबाबदारी निश्चित करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती विलंबाने मिळालेली आहे. व त्यामुळे जे माहिती अधिकारी असतील त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. ही बाब सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखानी जबाबदारी निश्चित करुनच ठरवावयाची आहे. माहिती ही विलंबाने म्हणजे दि. 30.9.2010 रोजी देण्यात आली हे निर्विवाद सत्य आहे. त्यातही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती अपूर्ण दिलेली आहे. त्यात मुद्या क्र. 6 व 7 ची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात दिलेली नाही. त्याबाबत चौकशी अहवाल असल्यास चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 6 व 7 प्रमाणे चौकशी झालेली असल्यास चौकशी अहवालाची प्रत व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांना 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. महानगर पालिकेचे प्रमुख यांनी जन माहिती अधिकारी कोण आहेत याबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे दरमहाचे वेतनातून रु. 5000/– ची वसुली करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1030-1032

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 169/2010

श्री राजन दि. भूसारी
द्वारा श्री डी.जी. भूसारी
लक्ष्मी सदा अपार्टमेंट 4 था मजला
साई मंदिर जवळ वर्धा रोड नागपूर 15 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अरुणराव कलोडे विद्यालय,
खामला नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 11.6.2010 रोजी अपील क्र. 1485/2007 व अपील क्रमांक 1486/2007 दि. 3.5.2008 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 प्रमाणे तक्रारदार यांच्या दि. 22.1.2007 व 8.1.2007 च्या अर्जामधील माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत.

2. गैरतक्रारदार हे अपील क्र. 1485/2007 व अपील क्रमांक 1486/2007 मधील सुनावणीत सुध्दा गैरहजर होते. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार यांना दि. 22.6.2010 रोजी आयोगाचे कार्यालयातून निर्णयाचे पालन न केल्यामुळे खुलासा मागविण्यात आला होता. गैरतक्रारदार यांनी दिनांक 6.7.2010 रोजी खुलासा दाखल केलेला आहे परंतू सदरच्या खुलाशावर त्यांची सही नाही.

3. तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. गैरतक्रारदार यांच्या खुलाशामध्ये तक्रारदार हे त्याच कार्यालयात कनिष्ठ लिपीक आहेत आणि नेहमी मुख्याध्यापिकेला फसवणूकीच्या दृष्टीने उचापती करीत राहतात. शाळेची डाग परस्पर पोस्टमॅन कडून घेवून महत्वाची पत्र गायब करतात. त्यातीलच हा एक प्रकार आहे. त्यांनी मुद्याम मला आपलया कार्यालयाचे सुनावणीचे पत्र मिळू दिले नाही. तसेच आपला दि. 3.5.08 चा निर्णय सुध्दा तब्बल दोन वर्षा नंतर प्राप्त झाला. तो लिफाफा आपल्या कार्यालयाचा असून आपल्या कार्यालयाचे जावक पत्र क्र. दि. 11.5.08 /1746 तब्बल दोन वर्षा नंतर पोस्ट केलेले आढळते. पाकीटावर पोस्टाच्या स्टॅम्पवर दि. 22.4.2010 स्पष्ट दिसते. त्या लिफाप्याची झेरॉक्सप्रत आपणास दि. 13.5.2010 च्या पत्रासोबत जोडून दिलेली आहे. तक्रारकर्ता श्री भुसारी यांनी माहितीच्या अधिकारात दि. 22.1.07 रोजी माहिती मागितली. त्यांत क्र. (3 व 4 मध्ये) आवश्यक असलेल्या माहितीच्या तपशिलामध्ये त्यांनी नमूद केले की शाळेत मला

भेटावयास येणा–या माझ्या वैयक्तीक व्यक्तीकडून माझ्या विरुध्द आपल्या कार्यालयाने लिहून घेतल्याबाबत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांकडून माझ्या विरुध्द लिहून घेतल्याबाबत. वास्तविक पाहता श्री भुसारी हे शाळेचे कनिष्ठ लिपीक आहेत. अनेकाकडून उधार उसणे घेतात व ते लोक शाळेत येवून पैशाची मागणी करतात आणि श्री भुसारी यांच्यावर कार्यवाही करा असे म्हणातात. माहितीचा अधिकार या नमुन्यातील क्र. 3 आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन मला भेटावयास येणाचा माझ्या वैयक्तीक व्यक्तीकडून माझ्या विरुध्द आपल्या कार्यालयाने लिहून घेतलेली माहितीची कागदपत्रे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांकडून माझ्या विरुध्द लिहून घेतलेली माहितीची कागदपत्रे आवश्यक. वर केलेल्या माहिती नुसार श्री भुसारी यांचे विरुध्द बाहेरील लोकांनी उधारीचे पैसे देत नाही अशा तक्रारी केल्या आहेत. तसेच शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी सुध्दा त्यांच्या कडून घेतलेली उधारी परत करत नसल्यामुळे माझ्याकडे तक्रारी केल्या. मी कोणकडूनही तक्रार लिहून घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना तक्रारीची प्रत देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्री भुसारी यांच्या सुटयांबाबतचा पुर्वेतिहास लक्षात घेता त्यांची नेमणूक दि. 1.8.1997 ला झाली. सत्र 04–05पर्यंत नियमानुसार सुटया घेतल्यानंतरही जवळ जवळ दोन वर्षे बिनपगारी सुटया झाल्या. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 जोडपत्र अ दि. 8.1.2007 अन्वये श्री राजन दि. भूसारी कनिष्ठ लिपीक यांनी वैद्यकीय रजा मिळण्यासाठी डॉ. रेखा म्हैसाळकर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले होते. दिर्घ रजा असल्यामुळे ते खरोखरच आजारी आहेत का? याची माहिती मिळविण्यासाठी प्रथम पत्र दिले नंतर माहितीच्या अधिकारात माहिती मागितली होती. परंतू त्यांनी ते पत्र स्विकारलेच नाही. व रजिस्टर लिफाफा तसाच पतर आला. त्यामुळे याबाबत त्यांना माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. श्री भुसारी सतत आचारसंहितेचा भंग करीत असतात. महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवाशर्ती) नियमावली 1981 मधील नियम क्र. 24 चे उल्लंघन करीत असतात. श्री भुसारी यांची (केळवद पोलीस स्टेशन) सावनेर कोर्टात केस सुरु आहे. नोकरी लावून देतो म्हणून महाराष्ट्र शासना सारखा खोटा नियुक्ती आदेश तयार करुन खोटे स्टॅम्प लावून लोकांना फसविल्याचा आरोप आहे. या संदर्भात त्यांना शाळेतूनच अटक करुन नेण्यात आले होते. 11 दिवस पोलीस कस्टडीत होते. यावरुन ते गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याचे स्पष्ट होते. सतत ते शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना धमक्या देत असतात. अनेकदा मुख्याध्यापिका म्हणून मलाही सतत भावनिक ब्लॅकमेल करीता असतात. धमकी सारखी भाषा वापरतात. शाळेत अनेक स्त्री पुरुष त्यांच्याकडे त्यांना न दिलेले पैसे मागायला येतात. अनेकांची फसवणूक करतात.

मी आपणास दि. 13.5.2010 चे पुर्नसुनावणी साठी अर्ज सादर केला व त्यात वस्तुस्थिती दर्शविली. ही बाब श्री भुसारी यांना कळताच त्यांनी दि. 11.6.2010 रोजी आपल्या कार्यालयाला पत्र लिहून माहिती मिळाली नाही अशी लगेच तक्रार केली. दोन वर्षच्या कालावधीती त्यांना आठवण झाली नाही. आपल्या कार्यालयाशी मी पत्रव्यवहार करताच लगेच त्यांनी दि. 11.6.2010 रोजी तक्रार नोंदविली. करीता कृपया आपल्या माहितीस खुलासा सादर.

गैरतक्रारदार यांची खुलाशावर सही जरी नसली तरी प्राचार्य अरुणराव कलोडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या अधिकृत लेटर हेड वर त्यांनी खुलासा पाठविलेला आहे. अपीलकर्ता यांनी सुध्दा अपीलाच्या सुनावणीत मुख्याध्यापिका यांच्या संदर्भात गैरप्रकार आयोगाचे निदर्शनास आणले होते. यावरुन तक्रारदार व गैरतक्रारदार यांच्या आपसातील भांडण्याच्या माध्यमातून सदरची माहिती तक्रारदार यांनी मागितलेली दिसून येते. गैरतक्रारदार यांनी तक्रारदार दि. 6.2.2007 रोजी त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती अत्यंत मोघम स्वरुपाची आहे व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे अशक्य आहे. तसेच दि. 22.1.2007 च्या अर्जाप्रमाणे सुध्दा मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविले होते. परंतू सदरचे पत्र तक्रारदार यांनी आयोगाचे निदर्शनास आणले नाही. गैरतक्रारदार यांनी त्यांना आयोगाचा निर्णय जो मिळाला त्या संदर्भामध्ये सुध्दा आयोगाकडे तक्रार केली आहे व आजही त्या हजर झालेल्या नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया आपसातील हेवेदावे या करीता वापर करणे हे योग्य नाही व त्यामुळे सदरच्या तक्रारीची सुनावणी ही पुन्हा एकवेळ घेणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळेल.

**आ दे श**

1) तक्रारीची सुनावणी पुन्हा घेण्यासाठी योग्य त्या तारखेस सुनावणी लावण्यात यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,मुंबई**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1005-1007

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 244/2010**

श्री डॉ. के. आर. सोनपुरे
ए–4, डॉक्टर्स कॉलनी
अजनी नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन
मुंबई ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 29.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मिळाली आहे असे तक्रारदार यांनी सांगितल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,मुंबई**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1009-

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 288/2010**

श्रीमती यशोधरा विश्वनाथ सहारे
मु. मालदुगी पो. गोठणगांव
ता. कुरखेडा जि. गडचिरोली ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री मोहन धनोटे
जन माहिती अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय
गडचिरोली ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 11.8.2010 रोजी अपील क्र. 231/2010 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार गैरहजर आहेत. व तक्रारदार यांच्या तर्फे ॲड. पी. एस. सहारे यांनी युक्तीवाद केला.

2. ॲड. पी. एस. सहारे यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अपीलाच्या निर्णया प्रमाणे एकुण 8 मुल्यांकन प्रती माहिती मिळाली. परंतू त्यांनी एकुण 13 मुल्यांकन प्रती माहिती मागितली होती व ती त्यांना मिळालेली नाही यावरुन एकुण 5 मुल्यांकन प्रती मिळालेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांच्या शाखेकडे 8 मुल्यांकन प्रती उपलब्ध होत्या त्या त्यांना दिलेल्या आहेत. परंतू महिला आर्थिक विकास महामंडळ ही एक सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी इतर शाखामध्ये जरी मुल्यांकन प्रती असतील त्या मुल्यांकन प्रती सुध्दा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. व त्यांनी ती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व या निर्णया नंतर सुध्दा ती त्यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

3. आदेश क्र. 2 मध्ये जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द एक हजार रुपयाची शास्ती लादण्यात आलेली आहे परंतू ती वसूल करण्यात आलेली दिसून येत नाही. तरी व्यवस्थापकीय संचालक यांनी ती वसूल करणे आवश्यक आहे. त्याबद्यलचा अहवाल महाराष्ट्र विधान मंडळास सादर करण्यात येतो व त्यात वसुली केली नाही असा उल्लेख केला जाईल याची नोंद घ्यावी. त्याकरीता तक्रार ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रारी ही अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत तक्रारदार यांना 5 मुल्यांकन प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, माविम, मुख्यालय, मुंबई** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
मुख्य माहिति आयुक्त,
राज्य माहिती आयोग,मुंबई
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1011-1012

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 234/2010

श्री ॲड. वा. सी. गायकवाड
मु. पो. मनसर
ता. रामटेक जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 10.5.2010 रोजी अपील क्र. 1184/2007 मधील दि. 19.1.2008 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार गैरहजर आहेत. त्यानंतर त्यांनी दि. 25.6.2010 रोजी तहसिलदार यांना उपलब्ध झालेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये आवश्यक असलेल्या माहितीचा लवलेशही नाही. मागितलेली माहिती अगदीच वेगळी आहे. व त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या शेडयूलमध्ये संपूर्ण माहिती आहे. त्याप्रमाणे अर्जदारास माहिती द्यावी असे दिले. त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी दि. 22.7.2010 रोजी स्मरणपत्र दिले. व त्यात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेल्या माहिती पेक्षा वेगळी माहिती पाठविलेली आहे असे पुन्हा नमुद केले. आयोगाचे कार्यालयातून दि. 28.7.2010 रोजी खुलासा मागविण्यात आला परंतू जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला दिसून येत नाही. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी दि. 11.7.2008 रोजी माहिती देण्याचे कळविले व अनुपालन झाले असे कळविले. परंतू त्यामध्ये जी माहिती मागितली ती दिली नाही व वेगळी माहिती दिली याबद्यल कोणताही खुलासा केला नाही. त्यामुळे तक्रारदार यांना त्यांच्या दि. 22.6.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरची जबाबदारी उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी तहसिलदार यांनी पाठविलेल्या माहितीची तपासणी करुन तक्रारदार यांना योग्य ती माहिती पुरविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून उपविभागीय अधिकारी रामटेक यांनी तहसिलदार यांनी जी माहिती दिली ती तपासून दि. 22. 6.2009 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता तक्रारदार ॲड. वा. सी. गायकवाड यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती तपासून घ्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,मुंबई**
**कॅम्प नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1011-1012

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 235/2010**

श्री अरुण अमृत गवई
सी.पी.डब्लू.डी. क्वार्टर नं. 27
टाईप–3 (जुने)
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री रवी काळे
जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार अकोला ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 13.8.2010 रोजी अपील क्र. 224/2010 दि. 9.4.2010 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

तक्रारदार यांनी सदरच्या तक्रारीच्या संदर्भात खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

आपले आदेशाप्रमाणे नमूद केलेले दोन्ही मुद्दे जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांना आदेशानुसार अर्जदारास विनामूल्य पोष्टाद्वारे माहिती पाठविण्याबाबत या कार्यालयाकडून निर्देश देण्यात आले. व त्यानुसार तलाठी लोणाग्रा यांनी अपीलार्थी यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या अंतर्गत अधिकार अभिलेख तयार करणे व सुस्थितीत ठेवणे नियम 1971 च्या नियम 30 अन्वये मालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तीची वहिती शेत जमिनीवर असल्यास त्याबाबतची नोंद गांव नमूना 7 ब मध्ये घेवून अहवाल तहसिलदार/नायब तहसिलदार यांचेकडे पाठविण्यात येतात. त्यानुसारच मौजे लोणाग्रा येथील गट नं. 76 व 115 मधील शेत जमीन गुणवंत किसन भटकर हे वहिती करीत असल्यामुळे नायब तहसिलदार यांचे कोर्टात 7 ब चे प्रकरण सादर करण्यात आले होते. याबाबतचे पत्र अपीलार्थी यांना दि. 6.7.2010 रोजी रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविण्यात आली आहे. व अपीलार्थी यांना उक्त पत्र प्राप्त झाल्याबाबत तक्रारीमध्ये नमूद केले आहे.

आपले आदेश दि. 9.4.2010 नुसार कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांचेकडून अपीलार्थी यांना देणे अभिप्रेत नव्हते. तरीही अर्जदार यांनी आपले समोर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपीलार्थीस माहिती पुरविली नाही अशी चुकीची तक्रार सादर केली आहे.

सदरच्या खुलाशाच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल अधिकारी व नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे नियम 1971 च्या नियम क्र. 1, 2, 3 प्रमाणे कार्यवाही अवलंबिलेली दिसून येते. व तसे स्पष्टपणे कळविलेले नाही. परंतू तलाठी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती त्यांनी वहीतीच्या आधारावर केलेली आहे. यावरुन स्पष्टपणे दिसून येते की त्यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. माहिती जशी आहे तशी उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे तक्रारदार यांनी अनियमिततेच्या संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करणे संयुक्तिक राहिल. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
मुख्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,मुंबई
कॅम्प नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1014-1015

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 152/2010**

श्री मोहन वासुदेव केळकर
प्लॉट नं. 90 उषःकाल बिल्डींग गांधीनगर
नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एस. ए. कुळकर्णी व श्री कठेंकर
जन माहिती अधिकारी
प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी
प्रशासकीय इमारत अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस मुंबई ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 16.5.2010 रोजी अपील क्र. 1194 नाग/2009 व अपील क्रमांक 1196 नाग/2009 दि. 6.2.2010 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही अशी तक्रार राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी संपूर्ण माहिती ही जन माहिती अधिकारी तथा आयुक्त आणि आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय यांचे प्रशासनाकडील माहिती मागितलेली आहे ती माहिती उपआयुक्त यांचेकडेच उपलब्ध आहे व त्यामुळे त्यांना 90 टक्के माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतू वरील अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस ही बाब स्पष्ट झालेली नसल्यामुळे आदेशामध्ये कार्यासन क्र. 1, 6, 8 च्या संदर्भामध्ये निर्णय झालेला आहे. व त्यामुळे आज कार्यासन क्र. 1, 6, 8 चे जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. आज मात्र अर्जदार हे प्रशासनाकडील माहिती उपलब्ध झाली नाही असा युक्तीवाद करीत आहेत. असे असल्यास उपआयुक्त प्रशासन यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 4.7.2009, 9.10.2009 व दि. 21.8.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून उपआयुक्त प्रशासन तथा माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या वर नमुद केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**
**कॅम्प नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1017-1018

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 236/2010

श्री अशोक माणिकराव भजन,
लिंगा,
पो. ता. काटोल जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती आशा पठाण
जन माहिती अधिकारी तथा
राजस्व अभिलेखागार विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 26.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 6.7.2010 रोजी अपील क्र. 186/2010 दि. 6.4.2010 च्या निर्णयातील आदेश क्र. 1 प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना दि. 4.10.10 रोजी नोटीस पाठवून दि. 26.10.10 रोजी सुनावणीसाठी बोलविण्यात आले. तक्रारदार व गैरतक्रारदार सुनावणीस हजर आहेत.

2. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दि. 2.8.2010 रोजी खुलासा मागविण्यात आला होता व तो खुलासा दि. 17.1.2008 रोजी प्राप्त झाला. व त्यामध्ये तक्रारदार यांना भूमि अभिलेख कार्यालय काटोल यांनी दि. 6.8.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने अभिलेख अपीलकर्ता यांना पाठविला असल्याचा अहवाल त्यांच्या कार्यालयात दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला असा खुलासा केला. गैरतक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की राजस्व अभिलेखागारामध्ये 1955 पासून पुढील माहिती उपलब्ध आहे. मात्र अपीलकर्ता यांनी माहिती सन 1947 ते 1954पर्यंत मागितलेली आहे. व त्यामुळेच ती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयात उपलब्ध होवू शकेल या कारणास्तव निर्णय दिलेला होता व त्याप्रमाणे दि. 3.6.2010 ला तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना प्रभारी अधिकारी राजस्व अभिलेख यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिले. त्याप्रमाणे दि. 5.8.2010 रोजी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. त्यानंतर दि. 12.8.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिली. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की उपलब्ध करुन दिलेली माहिती ही त्यांना सन 2007 मध्येच मिळालेली आहे व म्हणूनच त्यांनी तपशिलमध्ये सन 1947 ते 1954पर्यंतच्या नोंदीची माहिती मागितलेली आहे. परंतू ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर राजस्व अभिलेखागार यांनी असे सांगितले की तसे असेल तर ती माहिती उपलब्ध होणे शक्य

नाही. अभिलेखागारातील कर्मचारी आज हजर आहेत व त्यांनी सुध्दा असे सांगितले की सन 1955 पूर्वी पासूनची पुढील माहिती उपलब्ध आहे. परंतू पुर्वीची माहिती उपलब्ध असली तरी ती जीर्ण असून त्यांचे तुकडे पडतात व त्यामुळे तशीही ती माहिती उपलब्ध नाही. असे असले तरी सदरच्या माहितीचा पुन्हा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून राजस्व अभिलेखागार तथा माहिती अधिकारी पुन्हा एक वेळ मागितलेल्या माहितीचा शोध हा तहसिल कार्यालयातील अभिलेखागारातील अभिलेख तपासून उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**
**कॅम्प नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1020-1021

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 186/2010**

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर
भानापेठ वार्ड नं. 2
पोलीस लाईन जवळ चंद्रपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 25.5.2010 रोजी दि. 15.2.2010 चे माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती दिली नाही या कारणास्तव माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. परंतू अपीलकर्ता यांच्या दि. 15.5.2010 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपील क्र. 712 नाग/2010 हे खारीज करण्यात आलेले आहे. तक्रारदार यांनी दिनांक 26.4.2010 च्या निर्णयाचा उल्लेख केलेला आहे. तो प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय आहे व त्या निर्णयाविरुध्दच अपील क्र. 712 नाग/2010 हे होते व ते खारीज झालेले असल्यामुळे व त्याच अर्जाच्या संदर्भामध्ये सदरील तक्रार असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**
**कॅम्प नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1023-

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 177/2010**

श्री नितीन जी. ताटीया
345 श्रध्दा हाऊस पहिला माळा, किंग्जवे
नागपूर 44001 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री सलीम इकबाल
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता (विद्युत)
महानगर पालिका नागपूर सिव्हील लाईन्स,
ता. जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार श्री नितीन जी. ताटीया यांनी आयोगाच्या दिनांक 20.1.2010 च्या निर्णयाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. तक्रार अपील क्र. 1185/2009 मधील असून अपीलकर्ता ॲड. धनश्री खुशाल चिलबुले आहे. एका अपीलकर्त्याच्या संदर्भात अपीलामध्ये निर्णय दिला असल्यास त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही तर त्याच अपीलकर्त्यास अधिनियमाच्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार करता येते. परंतू त्याच निर्णयाच्या संदर्भामध्ये दुस–या कोणत्याही व्यक्तीस निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून तक्रार करता येत नाही. व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1025-

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 206/2010**

श्री निलेश सुरेशराव निंबाळकर
वार्ड नं. 10 मु. पो. नरखेड
ता. नरखेड जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री अशोक पी. ग–हाटे
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कार्यालय नरखेड
ता. नरखेड जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 12.7.2010 रोजी अपील क्र. 382/2010 दि. 18.5.2008 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी तक्रार आयोगापुढे केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. परंतू आज माहिती मिळाली तक्रार मागे घेत आहे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1027-

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 216/2010**

श्री एच. आर. पहूजा,
15/16, चिटणीसनगर, लेआऊट,
बैरामजी टाऊन नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री भिवगडे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
मंगळवारी झोन नं. 10
मंगळवारी बाजार, नागपूर
महानगर पालिका नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 23.6.2010 रोजी दि. 16.12.2008 व दि. 31.1.2009 रोजी अपील क्र. 2364 व 2561 च्या संदर्भामध्ये आदेशाचे पालन झाले नाही म्हणून तक्रार केलेली आहे. तक्रारदार गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. परंतू दिनांक 16.12.2008 व दिनांक 31.1.2009 रोजी वरील क्रमांकाच्या अपीलाचा निर्णय झालेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपील क्र. 2569/2007 व अपील क्र. 2354/2007 मध्ये तक्रारदाराच्या अपीलाचा निर्णय झालेला आहे व त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 6.2.2009 च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व सोबत माहितीची कागदपत्रे सुध्दा त्यांनी दाखल केलेली आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती जरी उपलब्ध झाली असली तरी त्यांनी दि. 23.6.2010 रोजी जी तक्रार दाखल केलेली आहे त्या तक्रारीमध्ये उपलब्ध झालेल्या माहिती बद्यल काहीही उल्लेख केलेला नाही व आजही गैरहजर आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्राप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

3. तक्रारदार यांनी तक्रार क्र. 39/2009 ही अपील क्र. 2354 हया निर्णयातील आदेशाप्रमाणे केली होती त्या सुनावणीस तक्रारदार गैरहजर होते. व आजही गैरहजर आहेत. तक्रारदार यांनी स्वतः संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश होते त्याबद्यल त्यांनी तक्रारीमध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. व त्यामुळे दि. 7.3.2009 तसेच दि. 8.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
मुख्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, मुंबई
कॅम्प नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1029-1030

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 195/2010

श्री गुलाबराव नागदेवे,
सचिव,
सिगमा गाळेधारक गृहनिर्माण स. संस्था मर्या.
इमारत क्र. 4 रघुजीनगर
नागपूर 24 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री रघुवंशी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक–3
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.6.2010 रोजी दिनांक 20.4.2010 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तसेच प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत. आज उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की तक्रारदार यांच्या अर्जातील माहिती ही नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळाशी संबंधित असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेणे असे कळविलेले दिसून येते. म्हाडाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागीय मंडळांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी नेमलेले आहेत. व त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे वर नमुद केल्याप्रमाणे त्यांना कळविलेले होते तसेच गाळा क्र. 4/1, 4/2, 176 गाळे अर्थसहाय्यीत उत्पन्न गट, रघुजीनगर, नागपूर या गाळयासंबंधाने सक्षम प्राधिकारी–2 यांचेकडे कलम 66 अंतर्गत प्रकरण क्र. 1 सन 2007 साली सादर केले. सक्षम प्राधिकारी–2 यांनी दि. 17.10.2008 च्या निर्णयाने श्रीमती चापके यांना गाळयातून निष्कासन आदेश निर्गमित केले. त्या निर्णयाविरुध्द अपील न करता मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचेकडे रिट पिटीशन क्र. 515/2009 दाखल केले. त्यामुळे श्रीमती चापके यांनी अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील क्र.15/2009 दाखल केले. सदर अपील प्रलंबित आहे. अपीलीय अधिका–याचे निर्णय प्राप्त झाल्यानंतर सदर निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा दिलेला असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
मुख्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, मुंबई
कॅम्प नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1032-1033

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 214/2010**

श्री दिलीप शालीग्राम ताथोड
मु. गुडेगांव पो. घोडेगांव
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
नवयुग विद्यालय तेल्हारा
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 15.6.2010 रोजी अपील क्र. 1450 अम/2009 च्या दि. 16.4.2010 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. मुख्याध्यापक यांनी दि. 11.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना स्वतः त्यांच्या पास बुकच्या तीन पानांच्या प्रती दिलेल्या आहेत व इतरांचे त्रयस्थ पक्ष म्हणून दिलेले पत्र व उत्तर दिलेले आहे. त्याचप्रमाणे मध्यवर्ती जिल्हा सहकारी बॅंकेचे पत्र दिलेले आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी ती पूर्वीच पत्रे त्यांना दिलेली आहे. परंतू शिक्षक व कर्मचारी यांचे बॅंकेतील पास बुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत दिलेली नाही. त्यावर पुन्हा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की पास बुक हे त्या त्या कर्मचा–यांजवळ असते व ती माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार नाहीत. असे असल्यास वेतन हे काढतांना पास बुकची छायांकित प्रत लावावी लागते असे तक्रारदार यांनी सांगितले व त्यामुळे ती माहिती मुख्याध्यापक यांचेकडेच असणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे कोणत्या तारखेला खाते काढले व प्रथम पगार कोणत्या तारखेला घेतला ही माहिती मुख्याध्यापक उपलब्ध करुन देवू शकतात. त्यावर मुख्याध्यापक यांनी तशी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितल्यामुळे तक्रार ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत शिक्षक व कर्मचारी–यांचे पास बुक खाते कोणत्या तारखेला उघडले व प्रथम वेतन कोणत्या तारखेला घेतले याबद्यलची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**मुख्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, मुंबई**
**कॅम्प नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1035-1036

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 205/2010

श्री पांडूरंग गणपतराव सपकाळ
रा. करंभाड पो. ता. पारशिवनी
जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री धर्मदाय घारड
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत कार्यालय करंभाड
पो. ता. पारशिवनी
जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 27.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 12.7.2010 रोजी अपील क्र. 294 नाग/2010 व मध्ये दि. 29.4.2010 रोजी झालेल्या निर्णयाप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. त्यावर गैरतक्रारदार यांनी जो आयोगाकडे खुलासा केलेला आहे त्या मध्ये दि. 21.6.2010 रोजी सचिव ग्रामपंचायत यांनी तक्रारदार यास आयोगाचे आदेशा प्रमाणे दि. 24.6.2010 रोजी ठीक 11.00 वा. ग्रामपंचायत कार्यालयत करंभाड येथे उपस्थित राहावे अशी नोटिस काढली होती. परंतू तक्रारदार हे बाहेरगावी गेलेले आहेत अशा प्रकारचा अहवाल चतुर्थश्रेणी कर्मचा-यानी सादर केलेला आहे तसेच दि. 22.6.2010 ला घरी गेलो असता वरील प्रमाणे सांगण्यात आले मा. दि. 23.6.2010 ला त्यांना ठिक 2 वा. 40 मिनिटांच्या सुमारास ग्रामपंचायतच्या फोन वरुन त्यांना कॉंट्रॅक्ट साधण्यात आला. त्या संदर्भातील दयालसींग लांजेवार, हरीराम शेंदरे व कंठा यांचा पंचनामा सादर केलेला आहे. दि. 30.6.2010 रोजी सुध्दा तक्रारदार उपलब्ध नव्हते. व ते माहिती घेण्याकरीता आलेले नाहीत. दि. 3.8.2010 ला राज्य माहिती आयोगाकडे खुलासा करतांना तक्रारदार हे कार्यालयात येत नाहीत व आयोगाकडे मात्र तक्रार करतात. तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की ते कार्यालयात गेले होते परंतू त्यांना माहिती दिली नाही. तसेच ग्रामपंचायत सचिव हे उपलब्ध होत नाहीत. परंतू एका लहानशा ग्रामीण गावात जेव्हा असे प्रसंग घडतात त्यावेळेस विनाकारण पत्रव्यवहार केला जातो किंवा समोरासमोर येण्याचे टाळले जाते असे दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता पुरावा सादर करणे आवश्यक असते हे त्यांनी लक्षात ठेवावे. तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
मुख्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, मुंबई
कॅम्प नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1038-1039

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 254/2010**

श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे
सावनेर वार्ड क्र. 17
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 11.8.2010 रोजीच्या तक्रार अर्जा प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की आयोगाच्या दि. 15.7.2010 च्या अपील अर्जावरील निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी आयोगाच्या कार्यालयात दि. 28.10.2010 रोजी घेण्यात आली परंतू त्यावेळी तक्रारदार गैरहजर होते. तसेच गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री विठोबा शेंबेकर हजर होते. त्यांनी आयोगापुढे असा लेखी खुलासा केला की मा. जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत तक्रारकर्त्यास कार्यालयीन शिपायाच्या हस्ते दि. 5.8. 2010 ला तसेच दि. 6.8.2010 ला त्यांचे घरी पाठविले. परंतू तक्रारदार घरी न मिळाल्यामुळे त्यांना ते पत्र हस्तदेय देता आले नाही. तथापी ते पत्र यु.पी.सी.ने पाठविल्या बाबत सहाय्यक अभियंता यांनी यु.पी.सी. चा पुरावा दाखल केला. तसेच सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असाही खुलासा केला की आयोगाच्या दि. 15.7.2010 च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली असून जमा केलेली रक्कम रु. 162/- परत करण्यात आलेली आहे. तक्रारदार हजर नसल्यामुळे या प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे एकुन घेता आले नाही म्हणून तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लू. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1041-

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 256/2010**

श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे
सावनेर वार्ड क्र. 17
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्रीमती पतंगे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 11.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपर यांचेकडील दि. 27.4.2007 च्या निर्णयातील आदेशा प्रमाणे अद्यापही त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून प्रस्तूत तक्रारीच्या संदर्भात राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दि. 28.10.10 रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत. त्यांनी सुनावणीत आणि त्यांच्याकडील दि. 27.2.2010 च्या पत्राप्रमाणे असा खुलासा केला की तक्रारदार यांना मा. राज्य माहिती आयोग यांच्या निर्णया नुसार करारनाम्याची प्रत त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. 3676 दि. 23.6.2009 अन्वये देण्यात आलेली आहे. इतर कागदपत्रांची किंवा नगर परिषदेच्या नाहरकत प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही असे दि. 10.6.2010 च्या पत्रान्वये कळविलेले आहे. म्हणून राज्य माहिती आयोगाच्या आदेशा प्रमाणे कार्यवाही झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लू. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1033-

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 292/2010 व तक्रार कमांक 293/2010**

श्री यशवंत नामदेवराव झाडे
नगरसेवक वार्ड क. 34
पोद्यार बगीचा, वर्धा
ता. जि. वर्धा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद वर्धा ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 18.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाने तक्रारी करुन असे नमूद केले आहे की त्यांना आयोगाच्या दि. 12.4.2010 च्या आदेशा प्रमाणे आणि दि. 6.4.2010 च्या आदेशा प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. आजच्या दोन्ही तक्रारीच्या सुनावणीस तक्रारदार गैरहजर आहेत. मात्र गैरतक्रारदार श्री वानखेडे जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद वर्धा हजर होते. त्यांनी सुनावणीच्या वेळी असे सांगितले की तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशा प्रमाणे आवश्यक ती माहिती दि. 24.9.2010 च्या पत्राने पुरविण्यात आलेली आहे आणि त्याबाबत तक्रारदार यांची पोच घेण्यात आलेली आहे. तक्रारदार यांची माहिती मिळाल्याची पोच त्यांनी सुनावणीत दाखल केली त्यामुळे सदरच्या दोन्ही तक्रारी हया खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार क. 292/20010 व तक्रार क. 293/2010 हया खारीज करण्यात येतात.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1034-

जा.क.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 258/2010

श्री वसंतराव बापुराव गावंडे
मु. पो. काळी (दौ.)
ता. महागाव जि. यवतमाळ ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार महागाव जि. यवतमाळ ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 17.5.2010 रोजीच्या तक्रार अर्जाप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केलेली आहे की राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या दि. 5.2.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना अद्यापही माहिती न मिळाल्यामुळे रु. 10 हजाराची शास्ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर कायम करावी. सुनावणीच्या वेळेला तक्रारदार हजर आहेत. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अद्यापही त्यांना अयोगाच्या दि. 5.2.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांच्या दिनांक 30.1.2008 च्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाची प्रत त्यांना मिळालेली नाही. गैरतक्रारदार यांच्या वतीने श्री सी. एन. कुंभलकर हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की तक्रारदार यांना दि. 1.4.2010 च्या पत्राप्रमाणे माहिती पुरविलेली आहे. मात्र दि. 1.4.2010 च्या पत्राची मुळ प्रत पाहीली असता त्या प्रतीवर तारखेबाबत खाडाखोड झालेली दिसून येते. तसेच सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने नेमकी कोणत्या दिवशी पाठविलेली आहे याचा बोध होत नाही. तसेच तक्रारदार यांना माहिती प्राप्त झाल्याबाबतची पोच दिली नाही. त्याचप्रमाणे श्री सी. एन. कुंभलकर हे सुनावणीत याबाबत कोणत्याही प्रकारचा सुयुक्तीक खुलासा करु शकले नाहीत. याउलट त्यांनी असे नमुद केले आहे की सदरचे प्रकरण तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांच्या कालावधीतील असल्यामुळे मला या प्रकरणात फारसे माहिती नाही. त्यामुळे ते या प्रकरणात समाधानकारक खुलासा करु शकले नाही. त्याचप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10 हजाराची शास्ती लावण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 30.1.2008 च्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांना दि. 5.2.2010 च्या आयोगाच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे रु. 10 हजाराची शास्ती का कायम करण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत करावा. त्यासाठी या निर्णयाची एक प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे त्वरीत पाठवावी.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्लू. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1047-1048

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 260/2010**

श्री सुभाष हरीश्चंद्र कापगते
मु. रेंगेपार कोहळी पो. पिंपळगाव
ता. लाखनी जि. भंडारा ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री दिलीप चाटोरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
त्रिवेणी हायस्कूल सडक अर्जूनी
ता. सडक अर्जूनी जि. गोंदिया ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 2.8.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केली आहे की राज्य माहिती आयोगाच्या दि. 20.5.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे शिक्षक हजेरी रजिस्टर सत्यप्रत, कु. जी. एस. बोरकर यांचा राजीनामा प्रत ही कागदपत्रे त्यांना मिळालेली नाहीत. तक्रार अर्जाची सुनावणी आज दि. 28.10.2010 रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक त्रिवेणी हायस्कूल सडक अर्जूनी यांनी असा खुलासा केला की तक्रारदारास दि. 26.6.2010 च्या पत्राप्रमाणे वार्षिक तपासणी अहवालाची प्रत देण्यात आलेली आहे. मात्र शिक्षक हजेरी रजिस्टर प्रत व कु. जी. एस. बोरकर यांच्या राजीनाम्याची प्रत ही दोन कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने पुरविता आलेली नाही. मात्र जी कागदपत्रे पुरविता आलेली नाहीत त्याबाबत तक्रारदारा त्यांनी स्पष्टपणे कळविणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी असे कळविलेले दिसून येत नाही. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना शिक्षक हजेरी रजिस्टर सत्यप्रत व कु. जी. एस. बोरकर यांचा राजीनामा प्रत उपलब्ध नसल्याबाबत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावे.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1037-

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 267/2010**

श्री प्रफुल्ल केवळराम मस्के
के.ऑफ ठोंबरे प्लॉट नं. 23 गल्ली नं. 11
विश्वकर्मानगर नागपूर ता. जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री पी. वा. थोटे
जन माहिती अधिकारी तथा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नरसाळा
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 28.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 5.8.2010 च्या तक्रारी अर्जात असे नमूद केलेले आहे की राज्य माहिती आयोगाच्या दि. 7.4.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती मिळालेली नाही. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार यांच्या तर्फे ॲड. एस.ए.देवळे हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी सुनावणीत असे नमूद केलेले आहे की त्यांना सन 1998–99 च्या कालावधीत ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्या नियुक्त्यांच्या आदेशाची प्रती मिळाल्यात. मा. त्या व्यतिरिक्त त्यांना आणखी माहिती पाहिजे होती ती मिळाली नाही. यावर गैरतक्रारदार यांच्या तर्फे ॲड. एस.ए.देवळे यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की तक्रारदार यांनी माहितीच्या अधिकारान्वये सन 1998–99 मध्ये झालेल्या नियुक्त्यांच्या संदर्भात नियुक्ती आदेशाच्या प्रती मागितलेल्या होत्या त्या त्यांना दि. 25.7.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने पुरविलेल्या आहेत व तक्रारदाराने त्या प्राप्त झाल्याचे मान्य केलेले आहे. तथापी तक्रारदारास सन 1998–99 या कालावधीतील नियुक्ती व्यतिरिक्त इतर वर्षाच्या नियुक्त्यांच्या आदेशाची प्रती हव्या असल्यास त्यांना माहिती अधिकाराखाली पुन्हा तसा अर्ज करण्याची मुभा आहे. तक्रारदारास सन 1998–99 च्या नियुक्ती आदेशाच्या प्रती मिळाल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1039-

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 305/2010

श्री सुर्यभान गुलाबराव मेश्राम
मु. हिंगणा पो. खुबाळा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री डी. एन. भगत
जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 27.7.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील दि. 15.7.2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी 10 दिवसाचे आंत आवश्यक ते कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाहीत. त्यानंतर मात्र त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी कबूल केले. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर यांनी त्यांच्या कडील दि. 21.9.2010 च्या पत्राप्रमाणे असे कळविले आहे की तक्रारदार यांची माहिती उपअभियंता जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सावनेर यांचे प्रकरणाशी संबंधित असल्यामुळे दि. 18.7.2010 रोजीच्या पत्रान्वये उपअभियंता जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सावनेर यांचेकडून माहिती मागविण्यात आली. सदर माहिती दि. 20.7.2010 रोजीचे पत्रान्वये त्यांचे कार्यालयास प्राप्त झाले. व त्वरीत दि. 21.7.2020 रोजीचे पत्रान्वये माहितीचे शुल्क भरण्यास तक्रारदार यांना कळविण्यात आले. तक्रारदार यांनी दि. 26.7.2010 रोजी शुल्क भरुन चालान सादर केल्यानंतर दि. 27.7.2010 रोजीचे पत्रान्वये तक्रारदार यांना माहिती पुरविण्यात आली. तथापी आयोगाचे दि. 15.7.2010 च्या आदेशात माहिती विनामुल्य पुरविण्याचे आदेश होते. म्हणून रु. 24/– शुल्क म्हणून जी रक्कम भरलेली आहे ती त्यांना परत करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांनी माहिती उपलब्ध होण्यासाठी रु.24/- भरलेले शुल्क त्यांना विनाविलंब परत करावे.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्लू. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1054-1055

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 268/2010

श्री जनार्दन गुलाबराव मून
केन्द्रिय अध्यक्ष नागरी हक्क संरक्षण मंच
791 नागसेन वन, बिनाकी रोड
नागपूर 17 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) सौ. सुनंदा मुश्रिफ
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिक्षक
समाज कल्याण विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 22.7.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे आयोगाकडे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील अपील क्र. 711/2009 दि. 22.9.2009 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांचेकडीत दि. 8.5. 2009 च्या अर्जाप्रमाणे रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर सौ. सुनंदा मुश्रिफ आणि प्रथम अपीलीय अधिकारी श्री सुरेंद्र पवार समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की तक्रारदार यांना दि. 23.11.2009 रोजी पत्र पाठवून माहिती घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले. परंतू ते कार्यालयात उपस्थित झाले नाही. त्यांनी दूरध्वनीवरुन माहिती घेण्यास माणूस पाठविलो असे सांगितले. तसेच पुन्हा एकदा ते कार्यालयात आले त्यावेळी त्यांना माहिती खुप मोठी असल्यामुळे पोस्टाने पाठविता येणार नाही आपण स्वतः घेवून जाण्यास त्यांना सांगण्यात आले परंतू त्यानंतर त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधला नाही व अनावधानाने सदर माहिती कार्यालयातच राहून गेली. आज सुनावणीच्या दिवशी त्यांना सदर माहिती देण्यात येत आहे. आणि त्यानुसार त्यांनी सुनावणीच्या वेळी उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास दिली. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्लु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1043-1044

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 283/2010

श्री नामदेव बालाजी तडस
बालाजी वार्ड बालाजी सभागृहाजवळ
मु. पो. ता. जि. चंद्रपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री रविंद्र गंगाराम माने
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 27.7.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की राज्य माहिती आयोग नागपूर यांच्या कडील दि. 17.4.2010 मधील निर्णयात दिलेल्या आदेशाप्रमाणे कोणतीही माहिती मिळाली नाही. तसेच राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे एफ.आय.आर. दाखल केल्याबाबतचे देखील माहिती मिळालेली नाही आणि त्याबाबत तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर पाठविलेले नाही.

2. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा श्री माने सुनावणीस हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की राज्य माहिती आयोगाकडील दि. 17.4.2010 चे निर्णयातील आदेशाप्रमाणे दि. 9.9.2010 नुसार पोलीस स्टेशन वरोरा यांना पत्र देवून नस्ती गहाळ करणा–या कर्मचा–यावर गुन्हा दाखल करण्यास कळविण्यात आले. त्यानुसार पोलीस स्टेशन वरोरा यांनी 0062493 एफ.आय.आर. क्र. 3054/2010 दिनांक 29.9.2010 नुसार जबाबदार कर्मचा–यावर गुन्हा दाखल केला असून एफ.आय.आर.ची प्रत राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली आहे असे त्यांनी खुलाशात नमूद केले आहे तसेच राज्य माहिती आयोगाकडील दि. 17.4.2010 चा निर्णय दिनांक 29.5.2010 च्या पत्रान्वये आयोगाकडून निर्गमीत झाले असून तो आदेश त्यांच्या कार्यालयाकडे जुन 2010 मध्ये प्राप्त झाल्याबरोबर दिनांक 10.6.2010 च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन वरोरा यांचेकडे संबंधितावर गुन्हा दाखल करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू पोलीस स्टेशन वरोरा यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी त्रुटी कळविल्यामुळे त्या त्रुटीची पूर्तता करुन पाठविण्यास सुचविले होजे. त्या दरम्यान वरोरा तालुक्यात एकुण 79 ग्रामपंचायतीच्या सार्वत्रीक निवडणूका सुरु होत्या तसेच अतिवृष्टीमुळे निवडणूका व अतिवृष्टीच्या कामात व्यस्त असल्यामुळे पोलीस स्टेशन वरोरा यांचेकडे गुन्हा दाखल करण्यास पूर्तता अहवाल पाठविण्यास विलंब झाला म्हणून दि. 9.9.2010 रोजी पूर्तता करुन गुन्हा दाखल केलेला

आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा संयुक्तिक दिसून येतो. तक्रारदार यांनी याबाबत असे नमूद केले आहे की या एफ.आय.आर.ची प्रत मला जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती तक्रारदारास देणे संयुक्तिक होणार असल्यामुळे एफ.आय.आर.ची प्रत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना विनामुल्य पोस्टाने 10 दिवसात पाठविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार वरोरा यांनी हा आदेश त्यांना मिळाल्याच्या दिनांकापासून 10 दिवसाचे आंत तक्रारदारास एफ.आय.आर.ची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टानी पाठवावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1047-1048

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 284/2010**

श्री सुनिल जॅकब
यीशू हाऊस 640/बी
एन.आर.सी.डी.सी कॉलनी
खलाशी लेन, नागपूर 440001 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (राजस्व)
जिल्हाधिकारी कार्यालय
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 4.8.2010 च्या तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाच्या अपील क्र. 563/2010 मधील निर्णयात दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत त्यांनी मागितलेल्या त्यांच्या दि. 29.9.2010 च्या अर्जातील नमूद केलेल्या जिल्हाधिकारी नागपूर यांच्या आदेशाच्या संदर्भात सुरु असलेल्या कार्यवाहीची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी असे नमूद केले आहे की तक्रारदार यांनी मागितलेली माहिती किचकट होती इतर ठिकाणचे रेकॉर्ड प्राप्त करुन माहिती द्यावयाची होती म्हणून ही माहिती तक्रारदार यांना दि. 25.10.2010 च्या पत्राने देण्यात आली. तथापी तक्रारदार यांचे या माहितीबाबत समाधान झाले नाही म्हणून तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे स्वतः उपस्थित राहून त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजा मधून नेमकी जी माहिती त्यांना पाहिजे आहे ते प्राप्त करण्यासाठी उपलस्थित राहणे संयुक्तिक होईल. कारण उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी देखील सुनावणीत सांगितले की तक्रारदार यांनी मागितलेली माहिती गुंतागुंतीची असल्यामुळे तक्रारदार हे स्वतः त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्यास त्यांना हवी असलेली माहिती पुन्हा उपलब्ध करुन देता येईल. म्हणून तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी तक्रारदार यांना हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना उपस्थित राहण्याबाबतची तारीख व वेळ कळवावी व तक्रारदार यांनी तारीख व वेळ कळविल्यानुसार उपस्थित राहून त्यांना हवी असलेली माहिती विनामुल्य जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. सदरची कार्यवाही त्यांना हा आदेश त्यांना मिळाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसाचे आत करण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1049-1050

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 327/2010**

सौ. कल्पना विजय कावरे
जुनी मंगळवारी गुजरी चौक
नागपूर 8 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी
दि विदर्भ प्रिमिअर को.–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 22.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत. सदरच्या माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी सहकारी गृहनिर्माण संस्थेस लागू होत नसल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी सहकारी गृहनिर्माण संस्थेस लागू नसल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1051-

जा.क्र.————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 281/2010**

श्री अब्दुल मजीद अब्दुल करीम
गांधी लेआऊट खरडा कंपनीमागे
कळमना रोड, येरखेडा
ता. कामठी जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
कामठी जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 29.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 7.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 29.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. व गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी जि. नागपूर यांच्या वतीने श्री वानखेडे नायब तहसिलदार सुनावणीस हजर आहेत.

2. नायब तहसिलदार श्री वानखेडे यांनी सुनावणीत असे सांगितले की, तक्रारदार यांनी यापूर्वी देखील दि. 27.9.2009 रोजी मा. राज्य माहिती आयुक्तांकडे अशाच प्रकारची तक्रार दाखल केलेली होती. त्या तक्रारीतील मुद्दे आणि आताच्या दिनांक 7.11.2009 च्या तक्रारीतील मुद्दे सारखेच आहेत. यापूर्वीची दि. 27.9.2009 रोजीची तक्रार मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांनी दि. 27.4.2010 रोजी खारीज केलेली असून तिचा तक्रार क्रमांक क्र. 211/नाग/2009 असा आहे. ती खारीज झाल्याचे आयोगाचे आदेशाची प्रत सुनावणीत त्यांनी दाखल केली.

3. यावरुन असे दिसून येते की पूर्वीची तक्रार क्र. 211/नाग/2009 आणि आताची तक्रार क्र. 281/नाग/2010 या सारख्याच स्वरुपाच्या असल्यामुळे आयोगाने तक्रार क्र. 211/नाग/2009 दि. 27.4.2010 च्या आदेशाने खारीज केलेली आहे. म्हणून आताची तक्रार क्र. 281/नाग/2010 मध्ये पुन्हा आदेश देणे योग्य नसल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1050-1051

जा.क्र.—————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 325/2010**

श्रीमती रिता शारीक अंसारी
तेल घाणी मोदी पडाव
ता. कामठी जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री मोहम्मद रियाझ
जन माहिती अधिकारी तथा रजिस्ट्रार
न्याय मंदिर जिल्हा न्यायालय नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 4.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला असता त्यांना जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी असे कळविले आहे की त्यांचा माहिती मागण्याचा अर्ज विहित नमुन्यात नसल्यामुळे तो निकाली काढला त्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही.

3. गैरतक्रारदार यांनी सुनावणीत असे नमुद केले आहे की तक्रारदार यांनी Maharashtra District Court Right to Information Rules 2009 मध्ये नमुद केलेल्या नमुन्यात माहिती अधिकाराखाली अर्ज करणे आवश्यक आहे. तथापी तक्रारदार यांचा विहित नमुन्यात अर्ज नसल्यामुळे त्यांना माहिती पुरविलेली नाही. म्हणून तक्रारदार यांनी Maharashtra District Court Right to Information Rules 2009 अंतर्गत विहित नमुन्यात अर्ज केल्यास त्यांना माहिती पुरविण्यात येईल. म्हणून तक्रारदार यांनी Maharashtra District Court Right to Information Rules 2009 अंतर्गत विहित केलेल्या नमुन्यात माहिती मागण्यासाठी अर्ज करणे संयुक्तिक राहिल. म्हणजे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त करता येईल. तक्रारदार याची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) तक्रारदार याची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्लु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1052-1053

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 261/2010**

श्री शंकरराव फकिराजी बानकर
पंचशिल (मस्जिद वार्ड क्र. 4) राजूरा (मा.)
जि. चंद्रपूर 442905 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक
नगर परिषद राजूरा
ता. राजूरा जि. चंद्रपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 2.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाकडील अपील क्र. 450/2010 व अपील क्रमांक 451/2010 दि. 26.5.2010 च्या निर्णयातील आदेशाची कार्यवाही न झाल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली नाही. सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निरीक्षक श्री प्रभाकर रायपुरे नगर परिषद राजूरा हे हजर होते. त्यांनी असे नमूद केलेले आहे की आयोगाकडील दि. दि. 26.5.2010 च्या निर्णयाप्रमाणे तक्रारदार यांना हव्या असलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. त्यासाठी आयोगाच्या या आदेशा प्रमाणे नगर परिषदेच्या बांधकाम विभागाकडे आयोगाचा आदेश पाठवून माहिती पुरविण्यासाठी शोध घेण्यास कळविले. बांधकाम विभागाने माहितीचा शोध घेवून दि. 19.10.2010 रोजी असे कळविले की सदर तक्रारदारास पाहिजे असलेली माहिती शोध घेवूनही उपलब्ध झालेली नाही. आणि त्या अनुषंगाने तक्रारदार यांना दि. 19.10.2010 रोजी कळविलेले आहे. आणि सदरचे पत्र तक्रारदार यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत कबूल केले. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्लु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1054-1055

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 320/2010**

सौ. बबीता ईश्वर रामटेके
द्वारा सौ. शिला लक्ष्मण जीवणे
घर क्र. 3266/एफ 9 जिन्नाथ किराण स्टोअर्स समारे
न्यु कैलास नगर नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री एन. व्ही. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता
महा. राज्य विद्युत मंडळ तुकडोजी चौक
मानेवाडा रोड नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 20.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाच्या दि. 11.6.2009 रोजी अपील क्र. 836/2008 मध्ये दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की तक्रारदार यांना दि. 28.10.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने आवश्यक असलेली माहिती पाठविलेली आहे. त्याबाबत रजिस्टर पोस्टाची पावती त्यांनी दाखल केली. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असही सांगितले की ते जानेवारी 2010 मध्ये या पदावर रुजू झालेले होते. मात्र दि. 11.6.2009 चे आयोगाचे आदेश त्यांच्या निदर्शनास कार्यालय अधिक्षकांनी आणून दिलेले नाही. त्यांनी आयोगाचे आदेश माझ्या लावकर निदर्शनास आणून दिले असते तर तक्रारदारास त्वरीत माहिती देता येणे शक्य होते कारण आयोगाचे दि. 11.6.2009 चे आदेश दि. 17.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले होते. म्हणून माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. यावरुन असे दिसून येते की विद्यमान जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील कार्यालयीन अधिक्षक हे माहिती देण्यासाठी सहाय्य करीत असतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) अन्वये जन माहिती अधिका–यास सहाय्य करणारा कर्मचारी हा देखील जन माहिती अधिकारी समजण्यात येतो. म्हणून प्रस्तूत प्रकरणी माहिती पुरविण्यास विलंब झाल्यामुळे तत्कालीन कार्यालयीन

अधिक्षक हे सहाय्यक जन माहिती अधिकारी समजण्यात येवून ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतात. त्याकरीता तक्रारदार यांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता आणि विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांनी आयोगाचे दि. 11.6.2009 चे आदेश त्यांच्या कार्यालयाकडे दि. 17.7.2009 रोजी प्राप्त होवूनही तक्रारदारास मुदतीत माहिती पुरविण्यास दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांना प्रत्येकी रु. 5 हजाराची शास्ती माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे का लादण्यात येवून नये याबाबतचा खुलासा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत करावा. अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल.

2) तक्रारदारास सुमारे 1 वर्ष 3 महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबास कार्यालयीन अधिक्षक हे देखील जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस त्यांच्या सक्षम अधिका–याकडे करण्यात येत आहे.

3) या आदेशाची प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना खुलासा करण्यासाठी पुरवावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **कार्यकारी अभियंता महा. राज्य विद्युत वितरण कंपनी महाल विभाग नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

5) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.1056-1057

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 265/2010

कु. सुलोचना गोविंदराव नासरे
मु. पो. मोवाड वार्ड नं. 16 घर क्र. 55
को.–ऑपरेटिव्ह बॅंकेजवळ
ता. नरखेड जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) सौ. एस. जी. पतंगे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 29.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की अपील क्र. 836/2010 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही. सौ. एस. जी. पतंगे जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी सुनावणीत असे नमूद केलेले आहे की सदरची माहिती मुख्याध्यापकाच्या स्तरावरील असल्यामुळे दि. 18.8.2010 च्या पत्राने मुख्याध्यापक जनता हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय खैरगाव ता. नरखेड यांना शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठवून तक्रारदार यांना 3 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविण्यात आले होते. त्यानंतर मुख्याध्यापक यांनी त्यांचेकडील दि. 6.9.2010 च्या पत्राने शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांना कळविले की तक्रारदार यांचा माहिती मागण्याबाबतचा अर्ज त्यांचेकडे केला नाही. त्यामुळे कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध होत नाही. तथापी मुख्याध्यापक यांच्या या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी परत मुख्याध्यापकांना निश्चित स्वरुपात कोणती माहिती तक्रारदाराला पाहिजे आहे हे कळविलेले दिसून येते नाही. तसेच शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांनी देखील मुख्याध्यापकाच्या या पत्राची गांभीर्याने नोंद घेतलेली दिसून येत नाही. कारण

मुख्याध्यापकाना दि.18.8.2010 चे पत्र त्यांच्या स्वाक्षरीने पाठविलेले होते. यावरुन असे दिसून येत की शिक्षणाधिकारी (माध्य.) हे देखील माहितीच्या अधिकाराकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. सौ. पतंगे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांनी असे नमूद केलेले आहे की त्या नुकत्याच या पदावर रुजू झालेल्या आहेत. तक्रारदार यांना त्यांचेकडील दि. 10.2.2010 च्या अर्जातील माहिती त्वरीत संबंधिताकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येवून तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. म्हणून त्यांनी मुदती मागितली. ही बाब विचारात घेवून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या दि. 10.2.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती 15 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग – 2 (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेवर शास्ती लादण्याची कार्यवाही करण्यात येईल.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्लु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1058-1059

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 266/2010**

श्री सैफ कमाल व मो. जाकीर अन्सारी
लकडगंज मिस्जिद जवळ कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) 1) सौ. एस. जी. पतंगे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.10.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 9.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.10.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.10.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी तक्रार अर्जाप्रमाणे अशी तक्रार केलेली आहे की आयोगाचे अपील क. 239/2010 च्या निर्णयातील दि. 12.4.2010 च्या आदेशाप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली नाही. गैरतक्रारदार सौ. एस. जी. पतंगे जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी सुनावणीत असे नमूद केलेले आहे की तक्रारदारास माहिती उपलब्ध होण्यासाठी मुख्याधापिका हजयानी खतीजा बाई गर्ल्स हायस्कूल कामठी यांना दि. 7.7.2010 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचे स्वाक्षरीने पत्र पाठवून तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे कळविलेले होते. परंतू तरी देखील तक्रारदारास माहिती उपलब्ध झालेली नाही. म्हणून आता सौ. एस. जी. पतंगे जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्य. शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी सुनावणीत असे नमूद केलेले आहे की तक्रारदार यांच्या दि. 23.2.2010 च्या अर्जाप्रमाणे संबंधित मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त करुन माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यासाठी त्यांनी मुदत मागितली. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (माध्य.) शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी तक्रारदार यांच्या दि. 23.2.2010 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन तक्रारदार यांना हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत पुरवावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1072-1073

जा.क्र.—————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**